Open Access

IJHSSBMC
ISSN (online) : 2583-181X

International Journal of Humanities, Social Science, Business Management & Commerce
(An International Peer-reviewed & Refereed Scholarly Open Access Journal)
ISSN (Online): 2583-181X
Journal homepage: https://ijhsbc.iar-a.com/
Vol. 08, Issue 02, June 2024; Pages 06 – 10
DOI: 10.5281/zenodo.11076590
SRJIF Impact Factor (2023): 8.1

Original Research Article

# आदिवासी लोकसाहित्य एक अमूल्य ठेवा

**प्रा. कु. सुप्रिया विद्याधर कांबळे**

सहाय्यक प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर जिला: सांगली ४१५४०९ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail:* kamblesupriya547@gmail.com

Received: 15 April, 2024 | Accepted: 27 April, 2024 | Published: 28 April, 2024

## प्रस्तावना

साहित्य हे समाजाच्या संस्कृतीचा आचार विचारांचे एक प्रतिबिंब आहे. यामध्ये चालीरीती रूढी परंपरा सामाजिक बांधिलकी या घटकांचा समावेश होतो. प्राचीन काळापासून समाजात अनेक स्थित्यंतरे झाली आहे. यामध्ये सामाजिक स्थित्यंतरात साहित्याने फार मोठी भूमिका निभावली आहे. समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे काम साहित्य नेहमीच करत आले आहे. साहित्याच्या विशाल प्रवाहातील एक उगवता प्रवाह म्हणजे लोकसाहित्य होय. लोकसहित्याचे प्रचलन हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे परंपरेने जात असते. आदीम काळापासून चालत आलेल्या या चालीरीती रूढी-परंपरा, लोककथा, लोकगीते, निरनिराळे खेळ, जादूटोणा, ज्योतिष इत्यादींचा समावेश लोकसाहित्यातच होतो.

अदिवासीच्या लोकसाहित्याची ही वाटचाल हजारो वर्षापासूनचे आहे. आदिवासींचे लोकसाहित्याशी अतूट नाते आहे. आदिवासींनी लोकसहित्याचा हा ठेवा अजूनही जपून ठेवलेला आहे. आदिवासींचे जीवनमानाचे दर्शन त्यांच्या लोककलां मधून घडते. म्हणूनच लोककलां मधून आदिवासी लोकसंस्कृतीचे जीवन प्रतिबिंबीत झालेले दिसते.

## लोक साहित्याची व्याख्या:

लोकसाहित्याला Folkore ही इंग्रजी सज्ञा सर्वप्रथम जॉन्स फॉर्मस या इंग्लिश पुरातत्वज्ञाने १८४६ मध्ये वापरली. Folkore या शब्दासाठी मराठीत वापरला जाणारा 'लोकसाहित्य' हा शब्द अधिक सार्थ असल्याचे दिसते. लोकसाहित्यामध्ये लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे, चालीरीती यांचा समावेश होतो. लोकसाहित्य हा मानवी जीवनातील अविभाज्य भाग आहे. लोकसाहित्य हे समकालीन घटनांचे एक प्रकारचे साक्षीदारच असतात. लोकसाहित्य हा केवळ गतकाळातील संस्कृतीचा अभ्यास नसून सांस्कृतिक जीवनाचा शोध आहे.

**जोनास बॅलिस:**

लोकसाहित्याची निर्मिती आदिम जीवनात झालेली असून ते परंपरेने पुढच्या पिढीस प्राप्त होत असते ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्याबरोबरच लोकविश्वास, लोकभ्रम, रूढी - प्रथा, नृत्य- नाट्य इत्यादी स्वरूपाचे असते, जो समूहाचा पारंपारिक लोकजीवनाचा अविष्कार म्हणजेच लोकसाहित्य'

**मारियास वार्डो:**

विविध व्यवसायाने ज्ञान, अनुभूती शहाणपणा, कौशल्य, सवयी आणि रूवी तसेच व्यवहार यांच्या संबंधीचे ज्ञान किंवा कृतीने एका पिढी पासून दुस-या पिढी पर्यंत जे चालत येते त्या सर्वास लोकसाहित्य म्हणावे.

लोक साहित्य म्हणजे ग्रामीण खेडवळ व जुन्या लोकांचे साहित्य नव्हे तर प्रत्येक प्रगत संस्कृतीची मुळे लोकसंस्कृतीत असतात. लोकसाहित्यातील रूढी, चालीरीती आधुनिक जीवनसरणीतही आढळतात. परंतु शहरीकरणाच्या प्रक्रियेत ही साधने लुप्त होत चालली आहेत.

**आदिवासी समाज:**

भारतात असंख्य जाती-जमाती आहेत. महाराष्ट्रात आदिवासींच्या जवळजवळ ४७ जमाती आहेत. भिल्ल, ठाकर, वारली, गोंड व कोकणा या जमातीचे वास्तव्य मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रात आहे. आदिवासी हा शब्दच मूळ किंवा आद्य संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारा शब्द आहे. आदिवासी या शब्दाची फोड केली असता आधी + वासी म्हणजेच या भूमीवर आधीपासून वास्तव्य असणारा तो आदिवासी. इ. स. पूर्व १५ व्या शतकात या काळात अनेक भटक्या डोळयांचा सिंधू संस्कृतीवर आघात झाला होता. ऋग्वेद, उपनिषद, पौराणिक साहित्यामध्ये आदिवासींचा उल्लेख आढळतो. आदिवासी जमाती स्वतःला या भूमीचे मूळ खरे वारसदार समजतात. आदिवासींच्या बोलीभाषेचा विचार करताना आपल्याला त्यांच्या भाषेमध्ये पारंपारिकता दिसून येते. भोळेभाबळेपणा अंधश्रद्धा, आपुलकी ही लक्षणे त्यांच्या स्वभावामध्ये दिसून येतात आणि हे सर्व आपल्याला लोकसाहित्यामधून समजते.

महाराष्ट्रातील विविध भागांत आदिवासींचेही लोकसाहित्य मुबलक आहे. नृत्य गाणी लग्नाची गाणी, सणाची गाणी अशी अनेक गीते आहेत. आदिवासींच्या लोकगीतांमध्ये निसर्गाची रसिकता आढळते. शिकार करताना आलेले प्रसंग रोजच्या जीवनातील सुखदुःखाचे प्रसंग, धार्मिकनिष्ठा हे विशिष्ट पद्धतीने वर्णन केलेले आढळते. जमातींच्या चालीरीती, वेशभूषा, अलंकार, जादूटोणा अशा प्रकारच्या गोष्टी देखील लोकसाहित्यात आढळतात. “लोकसाहित्य हे सामाजिक निषेधाचे वाहक आहे. लोकगीते, लोककथा, उखाणे, होळीचा फगवा, दिवाळीचे डोयरे, पोळयाच्या झडत्या, लग्नातील थट्टा मस्करी या प्रसंगाद्वारे व्यक्ती स्वतःची तसेच समाजाची प्रतिक्रिया नोंदवतो. ती समूहाची निर्मिती असल्यामुळे त्यावर कोणी अक्षेप ही घेऊ शकत नाही.”[१]

**गीलोण**: एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा समान बोलीभाषा बोलणारा व समान संस्कृती जीवन जगणारा पण अक्षर ओळखणे असलेल्या स्थानीय गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात.

**डॉ. रिव्हर्स:** ज्या ज्या समूहातील सदस्य एक समान बोलीभाषा बोलतात युद्ध वगैरे सारख्या उद्दिष्ट मूर्तीसाठी एक होऊन झटतात अशा सरळ व साध्या सामूहिक समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात.

प्रत्येक जमातीमध्ये सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक तसेच रुढी-परंपरा, राहणीमान, रिती-रिवाज यामध्ये विविधता आढळते. आदिवासींनी हजारो वर्षापासून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे लोकसाहित्याचे हे ज्ञान दिलेले आहे.

**आदिवासी लोकसाहित्याचे स्वरूप:**

महाराष्ट्रातील विविध भागात आदिवासींचे लोकसाहित्य मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. नृत्य, गाणी, लग्नाची गाणी, सणाची गाणी अशी अनेक गीते उपलब्ध आहे. आदिवासींच्या लोकगीतांमध्ये निसर्गाची रसिकता आढळते. शिकार करताना आलेले प्रसंग, रोजच्या जीवनातील सुखदुःखाचे प्रसंग, धार्मिक निष्ठा हे विशिष्ट पद्धतीने वर्णन केलेले आढळते.

आदिवासी समाज हा निसर्गाच्या सानिध्यात राहत असल्याने नदी-नाले, डोंगर, जंगले, शेती, पशुपक्षी, सण - उत्सव या सर्व गोष्टींचा प्रभाव त्यांच्या लोक जीवनावर पडलेला दिसतो. आदिवासींचे जीवन खडतर असले तरी येईल त्या संकटावर मात करण्याची ताकद निसर्गानेच त्यांना दिलेली आहे त्यामुळे निसर्गालाच ते आपला देव मानतात.

**लोकगीते:**

आदिवासीची लोकगीते मौखिक पद्धतीने साकार करुन आपली संस्कृती टिकवून ठेवलेली दिसते. त्यांच्या या लोकगीता मधून आदिवासींच्या जीवनातील विविध पैलूचे दर्शन घडते. त्यांचे रहाणीमान, सण- समारंभ, विवाहपद्धति, पोशाख, रुढी-परंपरा यांची माहिती मिळते. त्यांची ही लोकगीते एका पिढी कडून दुस-या पिढीकडे चालत आलेली आहेत.

“लोकगीते त्या त्या समाजांच्या बोली भाषेतच असतात समूहनिष्ठा हा लोकगीतांचा विशेष असतो. काही लोकगीते गंभीर आशयांनी भरलेली असतात. काही लोकगीतांमध्ये सूक्ष्मत्तर छटांचा अभाव असतो. पुनरावृत्ती हे लोकगीतांचे आणखी एक वैशिष्ट्य असते रचना साधी असते. रचना कडव्यात असते आणि त्यात पालुपद असते. ते ताल तत्त्वाने भरलेली असते म्हणून ते चालीवर म्हटले जाते.”[२]

**आदिवासींच्या जीवनात सण** – उत्सवाना फारच महत्त्वाचे स्थान असते. गौरी गणपती होळी दिवाळी हे सण मोठ्या आनंदाने साजरे केले जातात. सण साजरे करण्याची पद्धत ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. गौरीच्या सणाला स्त्रिया गाणी गातात, नृत्य करतात. यावेळी गायले जाणारे गाणे पुढील प्रमाणे-

गौरी नंदना विघना हरवले आम्ही आलो नाचायला
हात जोडूनी नमस्कार करावे घरवाले दादाला
गौरी नंदना विघना हरवले आम्ही आलो नाचायला
हात जोडूनी नमस्कार करावे ढोलक्या दादाला

आदिवासीमधे स्त्रिया प्रमाणे पुरुष ही कामडी नृत्य, मांदळ नृत्य, घोर नृत्य, श्रमपरिहार अशी अनेक लोकगीते ताला- सुरात गातात.

धरतारी माझी माय रे दादा
तिच्यावरी माझा पाय रे
पायांनी खंदलली रे दादा
हातानी गोळा केली रे (संकलित लोकगीते)

या गीतांमध्ये धरणी मातेला आदिवासी समाज वंदन करताना दिसतो.

**लोकनृत्य:**

आदिवासी समाज आपल्या रूढी परंपरा जपण्यासाठी भावभावना प्रकट करण्यासाठी, परंपरा जतन करण्यासाठी, मनोरंजन करण्यासाठी नाचगाणी करत असतात. त्यातून आनंद मिळवणे हा त्यांचा हेतू असतो. यामध्ये गौरी नृत्य, कामड नृत्य, होळी नृत्य, ढोल नृत्य अशा प्रकारचे नृत्य केले जातात. निसर्गाच्या सानिध्यात नाचगाणे करताना जमीन, आकाश, वेली, झाडे-झुडपे, फुले, डोंगर, नदी अशी पार्श्वभूमी लाभलेली आढळते. नृत्य आणि गीते यांचा समन्वय साधून सादर केलेली लोकनृत्य आदिवासींच्या कला कौशल्याचे दर्शन घडवितात.

"आदिवासींच्या जीवनात नृत्याला जे स्थान आहे ते इतर कोणत्याही समाजात नसेल त्यांची नृत्ये नेहमी सामुदायिक असतात. वैयक्तिक नृत्याची प्रथा या समाजात आढळून येत नाही. तसेच सर्वसाधारण भारतीय समाजामध्ये कुठेही आढळणार नाही असे त्यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे नृत्यात स्त्री आणि पुरुष दोघेही मनमोकळेपणाने भाग घेतात."[३]

**लोकनाट्य:**

आदिवासी नाटके समाज संस्कृतीतील कार्य असून ते धर्म भावनेतून निर्माण झालेले असते. हे नाटक आदिवासीच्या नैसर्गिक भावभावना, दैनदिन जीवनातील सुख दु;खे, गीतमय, संगीतमय, नृत्यमय, अभिव्यक्ति असते. मादळ, दंडार, बोहाडा, दिंडण, कामड, कणसरी, पंचमी इत्यादी नाट्यविष्कार असतात. या नाटका मधून आदिवासी जीवनातील आचार विचार, निती- अनीती, श्रद्धा, संकेत, आर्थिक समस्या, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक समस्या इत्यादीचे चित्रण साकार होत असते.

**लोकसंस्कृती**:

भारतातल्या अनेक राज्यांमध्ये कथा सांगणारा एक वर्ग आहे. कथा सांगून लोकांचे मनोरंजन करणे हा त्यांचा व्यवसाय आहे पण आधुनिक काळात मनोरंजनाची आधुनिक साधने उपलब्ध असल्याने हे लोकसाहित्य नष्ट होत चालले आहे. आदिवासी प्रामुख्याने जंगलात, दारी खो-यात, डोंगरकपारीत राहत असतो. आदिवासींचे जीवन काबडकष्ट ने भरलेले असते. त्यामुळे देवाधर्मा विषयी त्यांच्या कल्पना प्रबळ असतात. त्यामुळे त्यांचे जीवन समारंभ, उत्सव यानी पुरेपुर भरलेले असते. आदिवासी गातो, नृत्य करतो, नाटक करतो, चित्रे काढतो, काष्ट शिल्पे कोरतो अशी अनेक प्रकारची कार्य करीत असतो. म्हणजे मनोरंजनाबरोबर समाजत प्रबोधन करणे, एकात्मतेची भावना निर्माण करणे याविषयी भान निर्माण करीत असतो.

आदिवासींच्या लोकसाहित्यात विविधता आढळते. स्त्री जीवनातील सुखदुःख चालीरिती, सासर-माहेरचा जिव्हाळा, लग्न समारंभ, हळदीकुंकू या निमित्त स्त्रिया उखाणे घेतात यामधून पतीचे नाव गुंफून घेतले जाते तसेच सुखी संसाराचे वर्णनही केले जात. लोकसहित्याच्या या सर्वच प्रकारांमधून समाजाचे अंतरंग, भावभवना प्रकट होतात. जमातींच्या चालीरीती, वेशभूषा, अलंकार, जादूटोणा अशा प्रकारच्या गोष्टी देखील लोकसाहित्य मधून समजतात.

**लोकसाहित्याचे महत्त्व:**

श्रीमती दुर्गा भागवत लोकसाहित्याचे महत्त्व विशद करताना म्हणतात, "लोकसाहित्यही उच्च दर्जाची श्रुती आहे उदात्तसंहिता आहे प्रभावी लोक गाथा आहे आणि अलिखित पण अभिजात व अक्षर वाङ्मयात मोडणारा भारतीय जीवन संस्कृती दर्शक प्रेरक इतिहास आहे तो अमर आहे यात संदेह नाही लोकं साहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास आहे संस्कृतीचे सातत्य आणि तिच्यात होणारे बदल त्यांचे निरीक्षण करावयाचे झाले तर ते लोकसाहित्यात करावे लागे "[४]

डॉक्टर गंगाधर मोरजे म्हणतात, "लोकसाहित्य प्रायोगी कला आहे ते विशिष्ट लोकसमुदायाचे मनोरंजन करण्याचे यांना अल्हाद देण्याचे कार्यकर्ते कलांच्या आस्वादन प्रयोजन सारखे वेगवेगळे असू शकेल पण लोकसाहित्याचा प्रयोग करणारा आपल्या परीने तो प्रयोग रंजक करीत असतो हे नाकारता येत नाही त्यांच्या परिमिती कला निर्मिती असते व ज्या लोकसमूहासमूर्ती सादर केली जाते तो लोकसमूह ही कला म्हणून त्या प्रयोगाचा आस्वाद घेत असतो"[५]

**निष्कर्ष:**

आदिवासींचे कलात्मक अविष्कार केवळ मनोरंजन वा करमणुकीसाठी नसतात तर त्यामध्ये त्यांचे विशिष्ठ जीवनशैली असते. समाजावर सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक संस्कार घडवण्याचे काम आदिवासींचे लोकसाहित्य करत असते.

**संदर्भ सूची**


१. कालभूत, डॉ. पुरुषोत्तम, लोकसाहित्य: उद्गम आणि विकास, लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन नागपूर, पहिली आवृत्ती २००७, पृष्ठ क्र. १०.
२. कुबल, डॉ. रमेश, लोक साहित्याचे अंतरंग, शब्दालय प्रकाशन, पहिली आवृत्ती २०१४, पृष्ठ क्र. ६७.
३. गारे गोविंद, कडू महादेव गोपाळ, आदिवासींची गोड गाणी, श्री विद्या प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, ६ एप्रिल १९८६, मनोगत.
४. भागवत दुर्गा, प्रस्तावना, लोकसाहित्याची रूपरेषा, वर्धा बुक्स ,पुणे, दुसरी आवृत्ती १९७७.
५. डॉक्टर गंगाधर मोरजे, प्रस्तावना, लोकसाहित्य : एक स्वतंत्र अभ्यास क्षेत्र, दास्ताने रामचंद्र अँड कं. पुणे, प्रथम आवृत्ती १९८५ पृष्ठ क्र. ८.